केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रमांसाठी अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत (SCSP) सन २०१४-१५, २०१६-१७ व २०१७-१८ मधील प्रलंबित केंद्र हिश्श्यापोटी रू.११२६.६६ लक्ष व राज्य हिश्श्यापोटी रु.४८११.७४ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राआअ-०६१८/प्र.क्र.२९०/आ-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) स्वास्थ्य व परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकारचा अ.शा.पत्र. क्र.Z-२२०१५/२/२०१४-NHM-Finance, दिनांक १० डिसेंबर, २०१४.

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९.

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९.

४) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें. रा. हि. /१९४८७-४९४/२०१९-२०, दिनांक ११ जून, २०१९.

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह, सर्व प्रकारच्या गरजूंना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने आरोग्य विषयक सर्व केंद्र पुरस्कृत योजना एकत्रित करुन त्यास "राष्ट्रीय आरोग्य अभियान" असे नाव दिले. या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आता राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनांचा समावेश केला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान या केंद्र पुरस्कृत योजने करीता अनुसुचित जातीसाठी उपयोजनेंतर्गत (SCSP) सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत तरतुदीतून प्रलंबित केंद्र व राज्य हिस्सा राज्य

आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित अनुसुचित जातीसाठी उपयोजनेंतर्गत (SCSP) लाभार्थ्यांकरिता सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत तरतुदीतून सन २०१४-१५, २०१६-१७ व २०१७-१८ मधील प्रलंबित केंद्र हिश्श्याचा रु.११२६.६६ लक्ष व राज्य हिश्श्याचा रु.४८११.७४ लक्ष वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. केंद्र शासनाचा ६० टक्के केंद्र हिस्सा याकरिता लेखाशिर्ष २२१०F४८९ खाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मूळ पूरक मागणीद्वारे रु.२४२५३.६० लक्ष एवढी तरतुद अर्थसंकल्पित केलेली आहे आणि ४० टक्के राज्य हिस्सा याकरिता लेखाशिर्ष २२१०E४३७ खाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मूळ पूरक मागणीद्वारे राज्य शासनाने रु.२४३९८.१९ लक्ष एवढी मूळ तरतुद केलेली आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय ६०% केंद्र हिश्श्यापोटी ४०% राज्य हिश्श्यापोटी नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० साठी मंजूर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

अ. क्र.	तपशिल	केंद्र /राज्य हिस्सा (रु.लाखात)		
		लेखाशिर्ष	अर्थ संकल्पिय तरतुद (मूळ व पूरक)	मागणी रक्कम (६०% केंद्र व ४०% राज्य हिस्सा)
१	आर-१ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(०३) राष्ट्रीय	२२१०F४८९	२४२५३.६०	११२६.६६

	ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)			
२	आर-१ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च (०१) किमान गरजा कार्यक्रम (०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र पुरस्कृत योजना - राज्य हिस्सा ४० टक्के) (अजाउयो) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)	२२१०E४३७	२४३९८.१९	४८११.७४

४. वित्त विभागाच्या दिनांक १ एप्रिल, २०१९ व दिनांक ०८ जुलै, २०१९ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटी व शर्तीची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ८ जुलै, २०१९ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते १० मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येत असल्याचे त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०१/०४/२०१९ च्या शासन निर्णयातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे /अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे राज्य आरोग्य सोसायटीस अथवा सदरहू निधी ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.

५. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ १) क्रमांक १२३/अर्थोपाय, दिनांक १६ मार्च, २०१८, २) क्रमांक ६०/अर्थोपाय, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७, ३) क्रमांक ८०/ अर्थोपाय, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७, ४) क्रमांक ५०८/अर्थोपाय, दिनांक २७ डिसेंबर, २०१७ ५) क्रमांक ५०१/अर्थोपाय, दिनांक १९ डिसेंबर, २०१७, ६) क्रमांक १३२/अर्थोपाय, दिनांक २१ मार्च, २०१८, ७)क्रमांक ५०३/अर्थोपाय, दिनांक १९ डिसेंबर, २०१७, ८) क्रमांक ९६/अर्थोपाय, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७, ९) क्रमांक १८५/अर्थोपाय, दिनांक ३१ मार्च, २०१९, १०) क्रमांक २५३/२०१९/व्यय-१३, दिनांक १७ जुलै, २०१९, ११) क्रमांक ३९४/अर्थोपाय/२०१४-१५, दिनांक ०३ मार्च, २०१५ व १२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९५/अर्थ, दिनांक १० जुलै, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908131512211717 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.08.16 12:14:27 +05'30'

(ज. स. तडवी)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
६. सहाय्यक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१२.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१३. निवडनस्ती (आरोग्य-७) .